**वित्तीय वर्ष, २०१२-१३ च्या वार्षिक योजनेतील नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय संवितरणाकरिता, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ७ अन्वये महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिलेले निदेश.**

**प्रास्ताविकः**

१. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये भारताच्या राष्ट्रपतींनी केलेल्या " महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४ याद्वारे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळांच्या क्षेत्रांच्या संबंधात संविधानाच्या अनुच्छेद ३७१ चा खंड (२) उपखंड (ख) आणि (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपवली आहे. दिनांक ५ सप्टेंबर २०११ रोजी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी " विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश २०११ काढला (यात या पुढे ज्याचा उल्लेख "आदेश" असा करण्यात आला आहे) व त्याद्वारे उक्त तीन प्रदेशांसाठी स्वतंत्र विकास मंडळे गठित केली.

२. उक्त आदेशाच्या नियम ७ अनुसार, एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजांचा विचार करुन, विकास मंडळांच्या क्षेत्रांवरील विकास खर्चासाठी निधींचे समन्यायतेने नियतवाटप होत असल्याची खात्री करुन घेणे, ही महाराष्ट्राचे राज्यपाल यांची विशेष जबाबदारी आहे.

३. उक्त आदेशाच्या नियम ८ अनुसार, राज्यपाल यांनी केलेले निधींचे किंवा नियतव्ययांचे नियत वाटप, राज्य विधानमंडळापुढे ठेवावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रात दर्शवण्यात येईल आणि उपरोक्तपणे नियतव्ययांच्या संबंधातील विकास कार्ये, राज्य शासन पार पाडील किंवा पार पाडावयास लावील आणि असे नियतवाटप केलेले निधी हे, एका मंडळाकडून दुस-या मंडळाकडे न वळवता येण्याजोगे असतील.

**सिंचन क्षेत्रातील अनुशेषाची विद्यमान स्थितीः**

४. निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचन क्षेत्रातील (०१.०४.१९९४ रोजीच्या) जिल्हानिहाय अनुशेषाचे मूल्यमापन केले होते. सिंचन क्षेत्रातील ०१.०४.१९९४ रोजीचा वित्तीय अनुशेष रु. ७४१८ कोटी होता. वर्ष २००० मध्ये त्याची पुनर्गणना प्रचलित मापदंड विचारात घेऊन रु. ६६१८.३७ कोटी इतकी सुधारीत करण्यात आली होती. वर्ष २००१ पासून अनुशेष भरुन काढण्याच्या मुख्य उद्देशाने राज्यपाल निदेश देत आले आहेत. मार्च २०११ पर्यंत सर्व जिल्हयांमधील वित्तीय अनुशेष भरुन निघाला आहे. अनुशेषांतर्गत जिल्हयांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे भौतिक अनुशेष (एप्रिल १९९४ रोजी असलेल्या निव्वळ पेरणी क्षेत्राच्या संदर्भात निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेच्या राज्य सरासरी (३५.११%) च्या तुलनेत - रब्बी समतुल्य एककामध्ये) सूद्धा भरुन निघेल असे अपेक्षित होते. मात्र कालापव्यय आणि दर वाढ यांमुळे भौतिक साध्याबाबत अनुरुप कामगिरी झाली नाही.

५. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या अहवालानुसार, निर्देशांक व अनुशेष समितीने १.४.१९९४ रोजी गणना केलेल्या अनुशेषापैकी जून २००९ मध्ये राज्यातील रत्नागिरी, बुलढाणा, अकोला (वाशिम सह) आणि अमरावती या चार जिल्हयांमध्ये २,७३,७२० हेक्टर रब्बी समतुल्य

(रसतु) एवढा सिंचन अनुशेष शिल्लक होता. वर्ष २००९-१० मध्ये या चार जिल्हयांमधील १४०१२ हेक्टर (रसतु) चा अनुशेष दूर झाला. त्यामुळे २,५९,७०८ हेक्टर (रसतू) एवढा अनुशेष शिल्लक राहिला होता. या अनुशेषा पैकी बराचसा अनुशेष (२,५७,५१८ हेक्टर) अमरावती विभागातील चार जिल्हयांमध्ये होता. विदर्भ पाटबंधारे विकास मंडळ यांनी सादर केलेल्या आकडेवारीनुसार वर्ष २०१०-११ मध्ये अमरावती विभागाचा ९५७० हेक्टर सिंचन अनुशेष दूर झाल्याचे दिसते. रत्नागिरी जिल्हयाचा (२१९० हेक्टर) अनुशेष जून २०१२ पर्यंत दूर होईल असे अपेक्षित आहे.

६. अमरावती विभागातील गत चार वर्षातील अनुशेष निर्मूलन जोडपत्र दोनमध्ये दर्शविले आहे. अमरावती विभागामधील भौतिक अनुशेष दूर करण्यासंदर्भातील गती गेल्या ४ वर्षात मंदावली असल्याबाबत राज्यपालांनी चिंता व्यक्त केली आहे.

७. अमरावती विभागातील उर्वरित अनुशेष कालबद्ध स्वरुपात दूर करण्याच्या दृष्टीकोनातून विदर्भ पाटबंधारे विकास मंडळाने १२२ प्रकल्प प्राथम्याने हाती घेण्याचे निश्चित केले होते. तथापि, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणांने सादर केलेले त्रैमासिक अहवाल प्राथम्य प्रकल्पांच्या भौतीक साध्यामध्ये जलसंपदा विभागाने निश्चित केलेल्या उद्दिष्टांनुसार अनुरुप कामगिरी झाली नसल्याचे दर्शवितात. विदर्भ पाटबंधारे विकास मंडळाला क्षेत्रीय स्तरावरील वस्तूस्थिती लक्षात घेवून प्राथम्य प्रकल्पांची यादी सुधारित करण्याबाबत सप्टेंबर २०११, मध्ये निदेश देण्यात आले. त्यानुसार अमरावती विभागातील अनुशेष निर्मूलनासाठी विदर्भ पाटबंधारे विकास मंडळाने १०६ प्राथम्य प्रकल्प निवडले आहेत.

**सिंचन क्षेत्रांतर्गत नियतव्यय वाटपाची तत्वेः**

८. विदर्भ पाटबंधारे विकास मंडळाने वित्तीय वर्ष २०११-१२ पासून पुढील पाच वर्षांसाठी रु. ८३०५ कोटीचा सुधारित आराखडा तयार केला आहे. या सुधारीत आराखडयानुसार वित्तीय वर्ष २०१२-१३ साठी रुपये २३८५ कोटी एवढी मागणी आहे. राज्यपाल यांची अशी इच्छा आहे की, अनुशेष निर्मूलनाचा हा कार्यक्रम राबविण्यासाठी विदर्भ पाटबंधारे विकास मंडळाला पुरेसा निधी उपलब्ध करुन दयावा.

९. वर स्पष्ट केल्याप्रमाणे अनुशेष निर्मूलनासाठी आवश्यक निधी राखून ठेवल्यानंतर, राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, तीन प्रदेशांमध्ये विभाज्य योजना नियतव्ययाचे वाटप त्या प्रदेशाची लोकसंख्या आणि निव्वळ पेरणी केलेले क्षेत्र यातील प्रत्येक घटकाला समान भारांक देवून करावे. तीन प्रदेशांसाठी निधीच्या हिश्यांची टक्केवारी जोडपत्र ४ अ मध्ये दर्शविण्यात आली आहे. राज्यपाल यांना असे वाटते की, वर उल्लेखिल्या प्रमाणे नियतवाटप तत्वांसाठी २०११ च्या जनगणनेनुसार प्राप्त आकडेवारीचा वापर करणे योग्य होईल.

१०. उर्वरित महाराष्ट्र आणि मराठवाडा वैधानिक मंडळ क्षेत्रा अंतर्गत सिंचन महामंडळासाठी विशेष बाब म्हणून रु.४७५ कोटी राखून ठेवण्याबाबतच्या राज्य शासनाच्या प्रस्तावाला दिनांक २३.०९.२००८ च्या पत्रान्वये राज्यपाल यांनी मंजूरी दिली होती. वरील रक्कम उर्वरित महाराष्ट्र आणि मराठवाडा प्रदेशातील काही प्रकल्प शीघ्रतेने पूर्ण करण्यासाठी होती. आंतरराज्जीय लवादाच्या निवाडयात राज्याच्या हिश्याचा वापर पूर्णपणे करण्याच्या राज्याच्या प्रतिबद्धतेनुसार हे प्रकल्प घेणे

आवश्यक होते. राज्यपाल यांना असे वाटते की, या विशेष तरतूदीचा हेतू साध्य झाला असून या अतिरीक्त नियतव्ययातून विदर्भ प्रदेशाला हक्काचा हिस्सा मिळण्याच्या दृष्टीने आता समायोजीत करणे आवश्यक आहे. हे समायोजन दिनांक ८ मार्च २००८ च्या निदेशातील परिच्छेद ८.१ व जोडपत्र ५ च्या नियतवाटप तत्वानुसार आणि प्रस्तुत निदेशातील जोडपत्र ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे करावे.

**सिंचन क्षेत्रातील नियतवाटप करण्याची तत्वे (जनजाति उपयोजना).**

११. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, जनजाती उपयोजने अंतर्गत उपलब्ध निधीचे वितरण आदिवासी लोकसंख्या आणि आदिवासी उपयोजनेखालील क्षेत्रफळ यांना प्रत्येकी ५०% भारांक देवून करण्यात यावे. या तीन प्रदेशांसाठी असलेली आदिवासी उपयोजना निधींच्या हिश्यांची टक्केवारी जोडपत्र ४ब मध्ये दिलेली आहे.

१२. चालू आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये जलसंपदा विभागाच्या माहितीनूसार, मराठवाडा प्रदेशात आदिवासी विकास विभागाने निश्चित केलेल्या निकषात पात्र असणारा एकमेव प्रकल्प असल्यामुळे आदिवासी उप योजनेखालील नियतव्यय पूर्णपणे वापरणे शक्य झाले नाही. राज्यपालांचे असे मत आहे की, मराठवाडा प्रदेशासाठी आदिवासी उपयोजनेत राखून ठेवलेला निधी पूर्णपणे उपयोजीत करण्याच्या दृष्टीने वरील निकषात बसणारे पर्याप्त प्रकल्प हाती असतील याबाबत जलसंपदा विभागाने आवश्यक कार्यवाही करावी.

**२०१२-१३ या वार्षिक योजनेमध्ये सिंचन क्षेत्राकरिता नियतवाटप.**

१३. नियोजन विभागाने दिनांक १६ मार्च २०१२ रोजीच्या पत्राद्वारे असे दर्शविले आहे की, वार्षिक योजना २०१२-१३ मध्ये जलसंपदा विभागाकरिता रु. ७४४२.३९४२ कोटी इतके एकूण नियतवाटप उपलब्ध करुन देण्यात आले आहे. यापैकी रु. ५२९ कोटी इतकी रक्कम पूर नियंत्रण, खार जमिनी, जलविद्युत प्रकल्प आणि लाभक्षेत्र विकास इत्यादींसारख्या योजनांकरिता राखून ठेवण्यात येईल. आणखी, महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार कार्यक्रम, सामाईक योजना, (जसे जल विज्ञान प्रकल्प, यांत्रिकीकरण व गुण नियंत्रण इ.) आणि घ्यावयाचे प्रकल्पांचा शेल्फ निर्माण करणे यां सारख्या अविभाज्य योजनांसाठी रु.५१५ कोटी इतका नियतव्यय ठेवण्यात येईल.

१४. आंतरराज्य प्रकल्पांसाठी रु.१०० कोटी आणि गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पासाठी रु. ५५६ कोटी इतके नियतवाटप प्रस्तावित करण्यात आले आहे. राज्यशासनाच्या शिफारसीनुसार, पाच आंतरराज्य प्रकल्प आणि गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पांसाठी पुरेसा निधी प्राथम्याने मिळण्याच्या दृष्टीने निदेशांच्या कक्षेबाहेर ठेवण्यास राज्यपालांनी सहमती दिली आहे. आणखी, राज्य शासनाच्या शिफारसीवरुन, ठाणे जिल्हयातील भातसा-मुंब्री प्रकल्पाला वन प्रत्याक्षी मूल्य अदा करण्यासाठी रुपये ७६.०३ कोटी रक्कम निदेशाबाहेर ठेवण्यासाठी राज्यपाल यांनी परवानगी दिली आहे. जलसंपदा विभागाकरिता उर्वरित रु. ५६६६.३६४२ कोटी इतके विभाज्य नियतवाटप आहे, यामध्ये आदिवासी उपयोजनेखालील रु. १०३.३९४२ कोटीचा अंतर्भाव आहे.

१५. वर उल्लेखिलेले नियतवाटपाचे तत्व लक्षात घेऊन, राज्यपालांनी असे निदेश दिले आहेत की, २०१२-१३ च्या वार्षीक योजनेमध्ये सिंचन क्षेत्राकरिता वार्षीक योजनेचे नियतवाटप, पुढील रीतीने करण्यात येईल.

(१) सिंचन क्षेत्रासाठी एकूण नियतवाटपाच्या विभाज्य तरतूदीमधून, अनुशेष शिल्लक असलेल्या जिल्हयांसाठी पुरेसा निधी प्रथम राखून ठेवण्यात येईल. हे करतांना जलसंपदा विभागाने अनुशेष निर्मूलनासाठी तयार केलेल्या कृती आराखडयानुसार निधीच्या मागणीचा विचार करण्यात आला आहे. अनुशेष निर्मूलनासाठीच्या निश्चित केलेल्या प्रकल्पांची कामाची प्रगती तसेच एकूण राज्याच्या असलेल्या गरजा लक्षात घेऊन राज्यपालांचे असे मत आहे की, विदर्भ प्रदेशातील अमरावती विभागातील अनुशेष असलेल्या जिल्हयांमधील अनुशेष दूर करण्यासाठी, रु. ७५० कोटी इतकी अतिरीक्त तरतूद करण्यात यावी.

(२) उर्वरित नियतवाटप (अनुशेष दूर करण्याकरिता निधी राखून ठेवल्यानंतर) जोडपत्र ४अ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे भारित सरासरीच्या आधारे करावे. आदिवासी उपयोजनेखालील निधींचे नियतवाटप जोडपत्र ४ब मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावे.

(३) वित्तीय वर्ष २००८-०९ मध्ये उर्वरित महाराष्ट्र आणि मराठवाडा प्रदेशासाठी विशेष बाब म्हणून केलेल्या तरतूदींचे आवश्यक समायोजन सुध्दा करण्यात आलेले आहे.

(४) त्यामुळे, प्रदेशनिहाय अंतीम नियतवाटप खालील तक्त्यात दिले आहे. (रु. कोटी)

| प्रदेश | अनुशेष निर्मूलनासाठी नियतवाटप | आदिवासी उप योजना निधीचे नियतवाटप (जोडपत्र-५ब पहा) | दुरुस्तीनंतरची उर्वरित विभाज्य निधीचे नियतवाटप (जोडपत्र ५अ पहा) | एकूण नियतवाटप |
|---|---|---|---|---|
| विदर्भ | ७५०.०० | ४५.७८ | १४७४.२४ | २२७०.०२ |
| मराठवाडा | ०.०० | ५.५५ | १०८१.९९ | १०८७.५४ |
| उर्वरित महाराष्ट्र | ०.०० | ५२.०६ | २२५६.७४ | २३०८.८० |
| एकूण | ७५०.०० | १०३.३९ | ४८१२.९७ | ५६६६.३६ |

१६. अनुशेष असलेल्या अमरावती, अकोला (वाशीम सह) आणि बुलढाणा या जिल्हयांचा अनुशेष दूर करण्यासाठी राखून ठेवलेले नियतवाटप हे, विभाज्य असलेल्या उर्वरित नियतव्ययातून या जिल्हयांसाठी जलसंपदा विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या नियतवाटपाच्या अतिरिक्त असेल. अनुशेष आणि उर्वरित विभाज्य नियतव्यय या एकत्रित नियतवाटपातून या जिल्हयांमधील चालू बांधकामांसाठी (अनुशेष दूर करण्यासाठी अग्रक्रम ठरविलेल्या प्रकल्पांच्या बांधकामासह) लागणा-या निधीची पूर्तता होईल, अशी अपक्षा आहे.

१७. आणखी राज्य शासनाने, सिंचन क्षेत्रासाठी अर्थसंकल्पाशिवाय बाजारातून कर्जे घेण्याचा मार्ग अवलंबल्यास, अशा प्रकारे उभारलेला पैसा हा, संपूर्ण राज्यासाठी असावा आणि वर दर्शविल्याप्रमाणे, तीन विकास मंडळांमध्ये समन्यायतेने विभागण्यात यावा. आणखी असे की, या निदेशामध्ये अंतर्भूत असलेल्या नियतवाटपांशिवाय, सिंचन क्षेत्रासाठी पुरवणी मागण्यांद्वारे अतिरीक्त तरतूद उपलब्ध झाल्यास त्यांचे संवितरण जोडपत्र ४अ व ४ब मध्ये स्पष्ट केलेल्या प्रमाणानुसार या तीन विकास मंडळांच्या क्षेत्रामध्ये करण्यात येईल.

१८. राज्यात १.४.२०११ रोजी सिंचन महामंडळांकडून अंमलबजावणी होत असलेल्या प्रगतीपथावर प्रकल्पांची उर्वरित किंमत रुपये ७५,३६६/- कोटी (जोडपत्र ६) एवढी असल्याबाबत राज्यपाल यांनी चिंता व्यक्त केली आहे. अर्थसंकल्पिय साधन संपत्ती मर्यादीत असल्याने या प्रकल्पांचा प्राथम्यक्रम ठरविणे गरजेचे आहे. जर ही मर्यादित साधनसंपत्ती ब-याच प्रकल्पांवर "पसरली" गेल्यास परिणामी किमती व कालावधी वाढेल. या समस्येचे निराकरण करण्यासाठी राज्यपाल यांनी या संदर्भात खालील निदेश दिले आहेत.

अ) सिंचन क्षेत्रातील बांधील खर्चासाठी जो प्राधान्यक्रम आहे त्यात नवीन प्रकल्प हाती घेऊन तो कमी केला जाऊ नये. हे प्रतिबंध, खाली स्पष्ट केल्यानुसार, विदर्भातील गोदावरी खो-यातील सिंचन प्रकल्पांशिवाय, राज्यातील सर्व जिल्हयांना लागू राहतील.

(ब) विदर्भातील गोदावरी नदीच्या खो-यातील उपलब्ध सिंचन क्षमतेचा पूर्णपणे वापर झालेला नाही. जलसंपदा विभागाने दिलेल्या माहिती नुसार विदर्भातील गोदावरी पाणी वाटप लवादाने नियत केलेल्या ६७७.७५ अब्ज घन फूट पाण्यापैकी ५२२.८९ अब्ज घन फूट पाण्याच्या वापराबाबत नियोजन करण्यात आले आहे. उर्वरित उपलब्ध १५४.८९ अब्ज घन फूट पाण्याचा वापर करण्यासाठी नवीन प्रकल्पांचे नियोजन करणे गरजेचे आहे. भविष्यात पर्याप्त संख्येने प्रकल्प हाती असावेत आणि त्या बद्दलचे सांविधानिक सोपस्कार इत्यादींच्या प्रयोजनार्थ आवश्यक अंदाजपत्रकीय तरतूदींसह राज्य शासनाला नविन प्रकल्पांना प्रशासकिय मान्यता देता येईल. हे फक्त उपलब्ध पाण्याचे पूर्णतः वापर होण्यासाठी पर्याप्त प्रकल्प हाती घेण्यासाठी आहे. मर्यादित साधन संपत्ती वरील भार टाळण्यासाठी हे प्रकल्प प्रत्यक्षात सुरु करण्यात येऊ नयेत.

(क) जलसंपदा विभागाच्या आकडेवारी नुसार मार्च २०११ ला आदिवासी उप योजना क्षेत्रामध्ये प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पांवी उर्वरित किंमत सुमारे रु. ११०५ कोटी असल्याचे दिसते. आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये आदिवासी उप योजनेतून सिंचन क्षेत्रासाठी फक्त रु. १०३.३९४२ कोटी नियतव्यय उपलब्ध होईल असे नियोजन विभागाने प्रस्तावित केले आहे. म्हणून, राज्यपाल यांचे असे मत आहे की, नवीन प्रकल्प हाती घेण्यापेक्षा प्रगतीपथावरील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मर्यादीत निधीचा सुयोग्य वापर करण्याकडे लक्ष केंद्रित करण्यात यावे. त्यामुळे उर्वरित महाराष्ट्र आणि विदर्भ प्रदेशातील आदिवासी उप योजना क्षेत्रात कोणतेही नवीन प्रकल्प घेण्यात येवू नयेत. राज्यपाल यांच्या असे निदर्शनास आले आहे की, मराठवाडा प्रदेशात आदिवासी उप योजना

क्षेत्रामध्ये केवळ एक प्रकल्प प्रगतीपथावर आहे. त्यामुळे फक्त मराठवाडयातील आदिवासी उप योजना क्षेत्रामध्ये नवीन सिंचन प्रकल्प हाती घेण्यास परवानगी देण्याचे राज्यपाल यांनी ठरविले आहे.

(ड) राज्यपाल यांच्या दि. १० मार्च २०११ च्या निदेशातील परिच्छेद १४ नुसार, गडचिरोली जिल्हयातील विशेष समस्या लक्षात घेऊन गडचिरोली जिल्हयामध्ये नवीन प्रकल्प हाती घेता यावेत म्हणून गडचिरोली जिल्हा नविन प्रकल्प घेण्यासंदर्भातील प्रतिबंधाच्या बाहेर ठेवण्याचे ठरविण्यात आले होते. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधीकरणाने सादर केलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, गडचिरोली जिल्हयामध्ये ९ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. या ९ प्रकल्पांवरील उर्वरित किंमत आणि निर्माण होणारी सिंचन क्षमता अनुक्रमे रु. ४१८.५५ कोटी आणि १६२६० हेक्टर एवढी आहे. आणखी रु. ११४५ कोटींच्या उर्वरित किमतींचे ७ प्रकल्प वन जमिनीच्या बाबतीत मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांची सिंचन क्षमता ४२५७० हेक्टर आहे. गडचिरोली जिल्हयामध्ये सिंचन क्षमता वाढण्यासाठी शासनाने केलेल्या प्रयत्नांबद्दल राज्यपाल यांनी समाधान व्यक्त केले आहे. त्याचवेळी राज्यपाल यांना असे वाटते की, नवीन प्रकल्प हाती घेण्यापेक्षा गडचिरोली जिल्हयाला उपलब्ध होणा-या तरतूदींतून वर उल्लेख केलेल्या ९ प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पांना निधी पुरवावा आणि इतर ७ प्रकल्पांना वन विभागाची आवश्यक मान्यता मिळण्याबाबत प्रयत्न करण्यात यावेत.

(इ) असे निदर्शनास आले आहे की, प्रगतीपथावर असलेल्या काही प्रकल्पांमध्ये "व्याप्तीतील बदल" यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येते. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने असे निदर्शनास आणले आहे की, ही बाब नवीन प्रकल्पाला मंजूरी दिल्या सारखी होईल.जे की या पूर्वीच्या तसेच वर उल्लेखिलेल्या राज्यपाल यांच्या निदेशांना अनुसरुन नाही. त्यामूळे, जलसंपदा विभागाने चालू प्रकल्पांच्या "व्याप्तीतील " बदलास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित करावीत. ही मार्गदर्शक तत्वे वित विभाग, नियोजन विभाग आणि महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या सल्ल्याने ठरविण्यात यावीत.

१९. वार्षिक योजना २०१२-१३ मधील सिंचन क्षेत्रातील नियतव्ययाचे वितरण हे काटेकोरपणे प्रदेशनिहाय नियतवाटपाच्या प्रमाणात असावे. तसेच, तीन विकास मंडळांच्या प्रदेशांना वितरित होणारा निधी, त्यांच्याशी संबंधीत नियतवाटपाच्या प्रमाणात असेल.

२० निधीचा प्रभावीपणे वापर होणे व प्रकल्प वेळेवर पूर्ण करणे याची सुनिश्चिती करण्यासाठी, राज्यपाल यांनी असा निदेश दिला आहे की, सिंचन क्षेत्रासाठी नियतवाटप अर्थसंकल्पात कार्यनिहाय समाविष्ट करण्यात यावे आणि ते, अर्थसंकल्पीय दस्तऐवजांचा भाग असावे. राज्यपाल यांनी असा निदेश दिला आहे की, प्रधान सचिव (नियोजन), प्रधान सचिव (वित्त) व प्रधान सचिव (जल संपदा) यांचा समावेश असलेली समिती कार्यनिहाय नियतवाटपाची योजना तयार करुन राज्य शासनातील उचित प्राधिकरणाकडे त्यांच्या विचारार्थ सादर करील. केंद्रीय नियोजन आयोगाने बाराव्या पंचवार्षिक योजनेसाठी विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे अनुकरण या समितीने प्रकल्प निवडतांना करावे. नियतवाटप करते वेळी, पूर्णत्वाच्या मार्गावर असलेल्या प्रकल्पांना आग्रक्रम देण्यात यावा, जेणेकरुन त्यांचे फायदे नजिकच्या काळात शेतक-यांना मिळतील.

२१ जलसंपदा विभागाच्या महाराष्ट्रातील सिंचन स्थिती दर्शक अहवाल २००९-१० नुसार, राज्यात निर्माण झालेली एकूण सिंचन क्षमता ४६ लक्ष हेक्टर आहे. मात्र फक्त २५ लाख हेक्टर क्षेत्र (कालवे आणि विहीरींद्वारे) प्रत्यक्षात ओलिताखाली आहे. निर्माण झालेली सिंचन क्षमता आणि

वापरात असलेली सिंचन क्षमता यांच्यात असलेल्या तफावतींच्या कारणांपैकी वितरणात असलेल्या त्रुटी हे एक कारण असल्याबाबत अहवालात नमूद केले आहे. राज्यपाल यांचे असे मत आहे की, ही तफावत कमी करण्यासाठी शेवटच्या टप्यावर असलेले प्रगतीपथावरील प्रकल्प (विशेषकरुन वितरीकांची कामे) शीघ्रतेने पूर्ण करणे, आणि पाणी शेतापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. म्हणून शासनास असे निदेशित करण्यात येते की, शेवटच्या टप्प्यावर असलेली अशी कामे पूर्णत्वास नेण्यासाठी प्रत्येक विकास मंडळ प्रदेशासाठी आवंटित रकमेच्या ५% कमाल मर्यादेत पुरेशी रक्कम राखून ठेवण्यात यावी. ज्या प्रकल्पांमूळे दोन वर्षांच्या कालावधीत शेतक-यांना लाभ पोहोचेल अशाच प्रकल्पांची निवड या बाबींसाठी करण्यात यावी. जलसंपदा विभागाने निवडण्यात आलेल्या या प्रकल्पांच्या भौतिक प्रगतीचा तिमाही आढावा घ्यावा आणि अहवाल राज्यपालांच्या माहितीसाठी पाठवावेत.

**सिंचन क्षेत्रातील शासन व्यवस्थेशी निगडीत बाबी**

२२ राज्यपाल यांच्या असे निदर्शनास आले आहे की, अनुशेषांतर्गत जिल्हयांमध्ये उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या प्रमाणात भौतिक साध्याबाबत अनुरुप कामगिरी झालेली नाही. पुरेसा कर्मचारीवर्ग, अधिकारांचे प्रत्यायोजन, जमिनीची उपलब्धता आणि पुनर्वसनास होणारा विलंब या बाबींकडे प्राधान्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे, ज्यायोगे हे प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करता येतील. राज्य शासनाने जमिनीची मोजणी, भुसंपादन आणि पुनर्वसन अशा कार्यांसाठी असलेल्या विभागातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. राज्य शासनाने मोठे प्रकल्प कालबद्ध स्वरुपात पूर्ण करण्याच्या दृष्टीने जेथे आवश्यकता असेल तेथे अतिरीक्त मनुष्यबळ उपलब्ध होईल असेही पहावे.

२३ दिनांक १० मार्च २०११ च्या निदेशात, राज्यपाल यांनी असे निदेशित केले की, निधीचा प्रभावीपणे वापर होणे व प्रकल्प वेळेवर पूर्ण होणे याची सुनिश्चिती करण्यासाठी, सिंचन क्षेत्रासाठीचे नियत वाटप अर्थसंकल्पात कार्यनिहाय समाविष्ट करण्यात यावे. क्षेत्रिय अधिका-यांनी असे निदर्शनास आणले आहे की, क्षेत्रिय स्तरावरील अडचणीमुंळे काही प्रकल्पांसाठी नेमून दिलेल्या निधीचे उपयोजन करण्यामध्ये अडचणी येतात. दुस-या बाजूला निधी कमी पण भौतिक प्रगती चांगली असणारे प्रकल्पही आहेत. अशा परिस्थितीत, राज्यपाल यांचे असे मत आहे की, अनुशेष असलेल्या जिल्हयांमध्ये निधीचे पुनर्विनियोजन करण्याच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्यात यावे. ज्यायोगे नेमून दिलेल्या निधीचा पूर्णतः वापर होईल आणि जलसंपदा विभागाच्या कालबद्ध कार्यक्रमानुसार अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण होईल. यापूर्वी शासनाच्या दिनांक ०९.०६.२०१० च्या पत्रान्वये शासनाने विदर्भ पाटबंधारे विकास मंडळाला पुनर्विनियोजनाचे अधिकार दिले होते. अमरावती विभागातील ज्या चार जिल्हयांमध्ये भौतिक अनुशेषाचे निर्मूलन अदयाप व्हावयाचे आहे, त्या जिल्हयांमध्ये एका प्रकल्पावरुन दुस-या प्रकल्पावर निधीचे जिल्हयाअंतर्गत पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार याच धर्तीवर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाला देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे शासनाने निर्गमित करावीत. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने हे अधिकार काटेकोरपणे शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसारच वापरावेत.

**सिंचन क्षेत्रा व्यतिरीक्त अन्य क्षेत्रातील अनुशेषाची स्थिती**

२४ दिनांक १ एप्रिल १९९४ रोजी निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचनक्षेत्र वगळता अन्य सर्व क्षेत्रांमधील परिगणना केलेला एकंदरीत अनुशेष हा, रुपये ६५८८.७७ कोटी इतका होता. वित्तीय वर्ष १९९५-९६ ते २०११-१२ अखेर पर्यंतचा अनुशेष दूर करण्यावरील झालेला खर्च वजा

केल्यानंतर सिंचनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांतील अनुशेष रुपये ६३८.०१ कोटी राहील (जोडपत्र ७). ३१ मार्च २०११ रोजीच्या उर्वरित अनुशेषातून वित्तीय वर्ष २०११-१२ चा अपेक्षित खर्च वजा करुन हा प्रक्षेपित करण्यात आला आहे.

**ऊर्जा: कृषी पंपसंचाना वीज पुरवठा करणे**

२५ ऊर्जा क्षेत्रात कृषी पंप-संचांच्या विदयूतीकरणाचा वित्तीय अनुशेष दिनांक १ एप्रिल २००९ रोजी पूर्णपणे भरुन काढण्यात आलेला आहे. तथापि, ऊर्जा विभागाने दि १ फेब्रुवारी २०१२ रोजी ६ जिल्हयामध्ये ५८,०६८ पंप-संचांचा अनुशेष असल्याचे कळविले आहे. उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ अंतर्गत ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि विदर्भ विकास मंडळ अंतर्गत यवतमाळ,चंद्रपुर आणि गडचिरोली असे हे ६ जिल्हे आहेत. या ६ जिल्हयांमध्ये जानेवारी २०१२ अखेर ९५६७ इतके अर्ज आवश्यक रकमेचा भरणा करुन वीज जोडणीसाठी प्रलंबित आहेत. या ६ जिल्हयांमध्ये वित्तीय वर्ष २०१२-१३ मध्ये ९९०० पंप संचांना वीज पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ऊर्जा विभागाने ठरविले आहे. यासाठी विभागाने **रु. १५०.०८ कोटीची** मागणी प्रस्तावित केली आहे.

२६ वरील अनुशेष शिल्लक राहण्यामागे मागणीचा अभाव हे एक कारण असल्याचे दिसून आले आहे. राज्यपाल यांनी अपेक्षा व्यक्त केली की, जिल्हास्तरीय अधिका-यांनी विशेष मोहिम हाती घेऊन अभियान पध्दतीने शेतक-यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रवृत्त करावे.या संदर्भात ऊर्जा विभागाने योग्य त्या सूचना निर्गमित कराव्यात तसेच जिल्हा नियोजन समितीच्या बैठकांमध्ये याबाबतच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा.

**उच्च व तंत्र शिक्षण**

२७ उच्च व तंत्र शिक्षणाच्या क्षेत्रातील अनुशेषामध्ये औद्योगीक प्रशिक्षण संस्था, माध्यमिक तंत्र शाळा, व तंत्रनिकेतन या तीन घटकांचा समावेश आहे. विभागाने औदयोगीक प्रशिक्षण संस्थामधील विदयार्थी जागांचा अनुशेष दूर झाल्याचे कळविले आहे.अनुशेष निधीमधून १०० औदयोगीक प्रशिक्षण संस्थांच्या प्रशासकीय इमारती आणि कर्मशाळा यांची बाधकामे हाती घेण्यात आली होती. या १०० इमारतीपैकी, ७६ इमारती पूर्ण झाल्या आहेत. विभागाने वित्तीय वर्ष २०११-१२ मध्ये १४ इमारती पूर्ण होतील असे प्रक्षेपित केले आहे. जागे अभावी तीन कामे सुरु होऊ शकली नाहीत.वित्तीय वर्ष २०१२-१३ मध्ये विभागाने ७ चालू कामांसाठी **रु. ११.९७ कोटींची** मागणी प्रस्तावित केली आहे.

२८ तंत्र निकेतनाच्या उपक्षेत्रामध्ये २८१८ विदयार्थी जागांचा अनुशेष होता. यापैकी, २४६९ विदयार्थी जागांचा अनुशेष दूर झाला आहे. उर्वरित ३४९ विदयार्थी जागांचा अनुशेष ठाणे जिल्हाचा असून तेथे विक्रमगड तंत्र निकेतनाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. हे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर आणि अतिरीक्त पाळी सुरु करुन हा ३४९ विदयार्थी जागांचा अनुशेष भरुन काढला जाईल. नवीन तंत्रनिकेतनांची बांधकामे चार ठिकाणी प्रगतीपथावर आहेत. वित्तीयवर्ष २०१२-१३ मध्ये विभागाने आता या चालू बांधकामांसाठी **रु. २३.३० कोटींची** मागणी प्रस्तावित केली आहे.

२९ तंत्र माध्यमिक शाळांच्या उप क्षेत्रामध्ये ५३०१ विदयार्थी जागांचा अनुशेष होता. यापैकी ४६९३ विदयार्थी जागांचा अनुशेष हा, १६ जिल्हयांमध्ये ३४ नवीन तंत्र माध्यमिक शाळा सुरु करुन ३१ मार्च २०११ अखेर भरुन काढण्यात आला आहे. विभागाने आता असे सादर केले आहे की,

शिल्लक ६०८ विदयार्थी जागांपैकी, ५९ जागांचा अनुशेष, चालू वर्षी ६ तंत्र माध्यमिक शाळांमधील (ठाणे, नाशिक, गडचिरोली आणि जालना जिल्हयांतील) विदयार्थी प्रवेश संख्येच्या क्षमतेत वाढ करुन दूर करण्यात आला आहे. उर्वरित ५४९ विदयार्थी जागांचा अनुशेष मुंबई शहर (३१० जागा) आणि मुंबई उपनगर (२३९जागा) या जिल्हयांमधील आहे. विभागाने मुंबईतील बोरीवली आणि कुर्ला येथील २ विदयमान तंत्र माध्यमिक शाळांमध्ये अतिरिक्त तुकडी वाढवून २४० विदयार्थी जागांचा अनुशेष दुर करता येईल असे प्रस्तावित केले आहे. अनुशेष निधीचा वापर करुन ४२ तंत्र शाळांच्या प्रशासकीय इमारती आणि कर्मशाळा बांधकामे हाती घेयात आल्या. ५ शाळांमधील बांधकामे पूर्ण झाली आहेत. वित्तीय वर्ष २०११-१२ अखेर आणखी ३ शाळांमधील बांधकामे पूर्ण होणे अपेक्षीत आहे. विभागाने वित्तीय वर्ष २०१२-१३ मध्ये अनुशेष निधीमधून **रु. २०.१४ कोटी** इतर चालू बांधकामे पूर्ण करण्यासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे.

**सार्वजनिक आरोग्य सेवा**

३० दिनांक १ एप्रिल २००० रोजी सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये रु. १३५३.६७ कोटी वित्तीय अनुशेष होता. एप्रिल २००० ते ३१ मार्च २०११ या दरम्यान अनुशेष दूर करण्यावर रु. ५८७. ०४ कोटी खर्च झाला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने आता असे दर्शविले आहे की, वित्तीय वर्ष २०११-१२ मध्ये रु. १२८.६२ कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे, आणि वित्तीय वर्ष ११-१२ मध्ये रु. ६३८.०१ कोटी इतका अनुशेष शिल्लक राहील.

३१ दिनांक २७ मे २००९ च्या निदेशातील परिच्छेद २१ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे, सार्वजनिक आरोग्य विभागाने २०११-१२ पर्यंत आरोग्य संस्थांच्या प्रत्यक्ष पायाभूत सोयी पूर्ण करण्यासाठी योजना तयार केली होती. मात्र, कामांच्या वित्तीय आणि भौतिक प्रगतीमध्ये योजनेप्रमाणे अनुरुप कामगिरी झालेली नाही. विभागाला क्षेत्रिय स्तरावरील वस्तूस्थिती लक्षात घेऊन योजनेचे पुनरिक्षण करण्यास सांगण्यात आले. विभागाने वित्तीय वर्ष २०१२-१३ करिता ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे, रुग्णवाहिका, उपकरणे व इतर साधनसामग्री आणि फर्निचर या करीता **रु. २२८.९७ कोटी** इतकी रक्कम देण्याची विनंती केली आहे.

**सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी नियत वाटप**

३२ राज्यपालांनी असे निदेश दिले आहेत की, वर्ष २०१२-१३ वर्षात वार्षिक योजनेत सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी रुपये **४३४.४६** कोटी इतक्या रकमेचे नियतवाटप राखून ठेवण्यात यावे. सन २०१२-१३ या वर्षात अनुशेष दूर करण्यासाठी या नितव्ययाचे प्रदेशनिहाय नियतवाटप पुढीलप्रमाणे करण्यात यावे.

| अ.क्र. | प्रदेश | अनुशेष निर्मूलनासाठी नियतव्यय (रु. कोटीत) | एकूणाशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विदर्भ | २७५.५५ | ६३.४२ % |
| २ | मराठवाडा | ४७.५४ | १०.९४ % |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | १११.३७ | २५.६४ % |
| ४ | एकुण | ४३४.४६ | १००.०० % |

३३ याशिवाय प्रदेशांतर्गत अनुशेष दूर करण्यासाठीचे क्षेत्र-निहाय नियतवाटप जोडपत्र ८ मधील विवरण पत्रात दर्शविलेले आहे. सिंचन क्षेत्र वगळून अन्य क्षेत्रांमध्ये असलेला अनुशेष दूर करण्यासाठी स्वतंत्र तरतूद राखून ठेवावी. राज्यपाल यांनी नोंद घेतली आहे की, काही वेळा अनुशेष निधी संबंधित विभागाच्या सर्वसामान्य योजनांतर्गत निधीमधून तत्सम असलेले नियतवाटप वजा करुन उपलब्ध करुन दिला जातो. राज्यपाल यांच्या निदर्शनास आले आहे की, अशी समायोजने संबंधीत विभागाच्या एकूण विकास योजनांकरिता प्रत्यक्षपणे प्रतिकुल ठरतात. मुख्य सचिवांनी दिनांक ८ डिसेंबर २०११ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये, नियोजन विभागाने अनुशेष निर्मूलनासाठी आवश्यक असलेले नियतवाटप नियोजन विभागास आगावू कळविणेबाबत विनंती केली. त्याप्रमाणे दिनांक २ फेब्रूवारी २०१२ च्या पत्रान्वये वित्तीय वर्ष २०१२-१३ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत प्रदेशनिहाय आवश्यक नियतवाटप मुख्य सचिवांना कळविण्यात आले आहे. राज्यपाल यांनी निदेशीत केले आहे की, सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष निर्मूलनासाठीचे नियतवाटप काटेकोरपणे निदेशानुसार आणि विभागाच्या नियमित योजनांतर्गत नियतव्ययाचा पेक्षा अधिक व वेगळे असावे.

३४ नियतव्ययाचा बराचसा भाग चालू स्थापत्य कामांसाठी आहे. राज्यपाल यांनी सार्वजनिक आरोग्य, उच्च आणि तंत्र शिक्षण, नियोजन, वित्त आणि अनुशेष निर्मूलनासाठीच्या सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामध्ये समन्वय असण्याच्या आवश्यकतेवर भर दिला आहे, जेणेकरुन अभियान पद्ध्तीने अनुशेष निधीचा वापर होईल आणि कामे वेळेवर पूर्ण होतील. नियोजन विभागाने स्थापत्य कामांवरील अनुशेष निधी जिल्हा नियोजन समिती मार्फत पाठविण्याबाबतची शक्यता तपासून पहावी, यामुळे जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून समन्वय साधण्यासाठी मदत होईल.

**उर्वरित योजनांतर्गत नियतव्ययाचे वाटपाची तत्वे**

३५ सिंचन क्षेत्रासाठी असलेले नियत वाटप आणि अनुशेष असलेल्या इतर क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठीचा निधी वजा केल्यानंतर, योजनांतर्गत उर्वरित नियतव्ययाचा विभाज्य भाग, तीन प्रदेशांमध्ये त्या त्या प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात संवितरण करण्यात यावा. हे करतांना जनगणना २०११ ची आकडेवारी विचारात घ्यावी. योजनांतर्गत उर्वरित नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय नियत वाटपात, त्या क्षेत्रामधील त्या त्या प्रदेशांच्या गरजा व विकासाच्या संधी याचा विचार करुन, त्या तीन प्रदेशांमध्ये क्षेत्रनिहाय वितरण करण्यासाठी लवचिकता असेल. तथापि प्रदेशांची सर्व क्षेत्रीय नियतव्ययाची एकूण रक्कम ही योजनांतर्गत उर्वरित नियतव्ययातील त्या त्या प्रदेशांच्या हिश्याच्या एकूण कमाल मर्यादेच्या अधिन राहील.

३६ राज्यपाल यांच्या असे निदर्शनास आले आहे की, वार्षिक योजना २०११-१२ मध्ये अविभाज्य भाग सुमारे रु. १०,८१३ कोटी एवढा होता. हा राज्याच्या वार्षिक योजनेच्या जवळपास २६ % आहे. राज्यपाल यांच्या असेही निदर्शनास आले आहे की, काही बाबींवर असलेला खर्च अविभाज्य म्हणून वर्गीकृत करण्यात आला आहे, जो प्रदेशनिहाय खर्च म्हणून वर्गीकृत करता येणे शक्य आहे. उदा. नागरी विकास उपक्षेत्रातील जवाहरलाल नेहरु नागरी पुनरोत्थान अभियान (रु. २५०० कोटी), महाराष्ट्र नगरोत्थान अभियान (रु.२५० कोटी) आणि नागरी छोटया आणि मध्यम शहरांसाठी पायाभूत सूविधा विकास योजना (रु. ४०० कोटी) यासाठी अर्थसंकल्पित नियतवाटप अविभाज्य म्हणून दर्शविण्यात आले आहे. परंतु वरील योजनेवरील तरतूद वापरणा-या महानगरपालिका अथवा नगरपरिषदांना ओळखणे सहज शक्य आहे.

३७ अविभाज्य शीर्षाखालील खर्चाची टक्केवारी, अवाजवी दिसून येते. यामूळे प्रदेशनिहाय नियतव्ययाच्या वितरणामध्ये विपर्यास उदभवू शकतात. राज्यपाल यांनी याद्वारे आदेश दिले आहेत की, नियोजन विभागाने खर्चाच्या ज्या बाबी अर्थसंकल्पीत दस्तावेजात अविभाज्य म्हणून वर्गीकृत केल्या आहेत, त्यांची पुनर्तपासणी करावी आणि शक्य तिथे योग्य रीतीने बदल करावेत. काही प्रकरणी हे वर्गीकरण आर्थिक वर्षाच्या प्रारंभी करता येणे शक्य होणार नाही. परंतु आर्थिक वर्षाच्या शेवटी विभाज्य म्हणून वर्गीकृत करणे शक्य असल्यास, नियोजन विभागाने मागील वित्तीय वर्षाच्या खर्चाच्या आधारावर तशी परिगणना करावी. हे परिगणन संबंधीत विभागांच्या सल्ल्याने करावे. वित्तीय वर्ष २०११-१२ साठीचा या संदर्भात अहवाल राज्यपाल यांच्या माहितीसाठी जुलै २०१२ पर्यंत सादर करावा.

३८ राज्यपालांच्या पूर्वमान्यतेशिवाय, कोणताही निधी अनुशेष असलेल्या जिल्हयांकडून अनुशेष नसलेल्या जिल्हयांकडे आणि एका विकास मंडळांच्या क्षेत्राकडून दुस-या विकास मंडळाच्या क्षेत्राकडे वळविता येणार नाही.

**विकास मंडळांची सुधारित भूमिका**

३९ दिनांक ५ सप्टेंबर २०११ च्या आदेशानुसार विकास मंडळांची कार्ये निश्चित करण्यात आली आहेत. यामुळे समतोल प्रादेशिक विकासाबाबत वैचारिक संस्था म्हणून परिणामकारकरित्या काम करण्यास त्यांना मदत होईल. राज्यपाल यांनी विकास मंडळांनी चालू वर्षात अनुसुचित क्षेत्रामध्ये घेतलेल्या परिणाम निर्धारण अभ्यासाबाबत समाधान व्यक्त केले आहे. वित्तीयवर्ष २०१२-१३ मध्ये, राज्यपाल यांनी अशी इच्छा व्यक्त केली आहे की, प्रत्येक विकास मंडळांनी कमीत कमी दोन

जिल्हयांचा जिल्हा विकास अहवाल तयार करावा. जिल्हयांची निवड करतांना विकास मंडळांनी मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या जिल्हयांना प्राधान्य दयावे. आणखी, विकास मंडळांच्या उद्देशानुसार मंडळांनी इतर अभ्यासही घेणे सुरु ठेवावे. वरील जबाबदा-या पार पाडण्यासाठी राज्यपालांनी विकास मंडळांना रु.२ कोटी राखून ठेवावेत असे निदेश दिले आहेत. नियोजन विभागाने त्यांच्या गरजेनुसार त्यांना निधी उपलब्ध करुन दयावे.

**तज्ञ समिती**

४० समतोल प्रादेशिक विकासासंदर्भात अभ्यासासाठी डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समितीच्या स्थापनेची राज्यपाल यांनी नोंद घेतली आहे. राज्यपाल यांची अपेक्षा आहे की, आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी निर्गमित करावयाच्या निदेशासांठी समितीच्या शिफारसी उपयुक्त ठरतील. यादृष्टीने शासनाने तज्ञ समितीला सर्वतोपरी सहाय्य करावे.

**निदेशांचे अनुपालन करण्यासंबंधीचे कार्यतंत्र**

४१ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ११ (च) आणि कलम २१ (१) व (२) मधील तरतुदींनुसार, राज्यपालांच्या निदेशांच्या अंमलबजावणीवर संनियंत्रणाची जबाबदारी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने सिंचन क्षेत्राशी संबंधीत निदेशांच्या अंमलबजावणीचा नियतकालीक आढावा घ्यावा आणि राज्यपालांच्या माहितीसाठी तिमाही अहवाल सादर करावेत.

४२ राज्यपाल यांचे असे मत आहे की, अनुशेष निर्मूलनाशी संबंधीत कामांच्या प्रगतीवर नियंत्रण व्यवस्था असणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, या निदेशांच्या अंमलबजावणीबाबत विभागीय आयुक्तांनी त्रैमासिक आढावा घ्यावा, आणि तसे अहवाल राज्यपालांचे माहितीस्तव सादर करावेत. त्याच प्रमाणे, मुख्य सचिवांनी याबाबत नियतकालिक आढावा घ्यावा आणि राज्यस्तरावरील काही धोरणात्मक मुद्दे असल्यास त्यांचे योग्य निराकरण करावे. मुख्य सचिवांनी त्रैमासिक अहवाल राज्यपालांचे माहितीस्तव सादर करावेत.

४३ वित्तीय वर्षाच्या शेवटी पाटबंधारे विकास महामंडळोकडे मोठया प्रमाणावर अखर्चित शिल्लक राहात असल्याबाबत राज्यपाल यांनी चिंता व्यक्त केली आहे. जलसंपदा विभागाने दि. १५.३. २०१२ च्या पत्रान्वये, वित्तीय वर्ष २००९-१० आणि २०१०-११ अखेर रु. २४३८ कोटी आणि रु.३४९६ कोटी अखर्चित रक्कम शिल्लक राहिल्याचे कळविले आहे. ही रक्कम त्या त्या वर्षाच्या एकूण नियतव्ययाच्या ३५% आणि ४५% आहे. आणखी, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक मंडळाच्या वित्तीय वर्ष २००९-१० च्या अखर्चित शिलकेच्या जलसंपदा विभागाने कळविलेल्या आकडेवारीमध्ये तफावत आहे. जलसंपदा विभागाने सुरुवातीला (दि.१३.५.२००९ च्या पत्रान्वये) उर्वरित महाराष्ट्र वैधानिक मंडळ क्षेत्राची अखर्चित शिल्लक रु. ४६७ कोटी असल्याचे कळविले होते. जलसंपदा विभागाने दि. १५.३.२०१२ च्या पत्रान्वये ही रक्कम नंतर रु. १००७ कोटी अशी सुधारीत केली आहे. पाटबंधारे महामंडळांकडील मोठया प्रमाणातील अखर्चित शिलकेची कारणे तसेच जलसंपदा विभागाच्या आकडेवारीमधील विसंगतीची कारणे तपासून पाहण्याबाबत राज्यपाल यांनी मुख्य सचिवांना निदेश दिले आहेत. याबाबत संबंधीत विभाग आवश्यक ती सुधारणा हाती घेतील याची मुख्य सचिवांनी खात्री करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यात राज्यपाल यांचे माहितीस्तव सादर करावा.

४४ दि. १० मार्च २०११ च्या निदेशातील परिच्छेद ३५ च्या अनुपालना संदर्भात, नियोजन विभागाने सिंचन क्षेत्रासह सर्व क्षेत्रांचे प्रदेशनिहाय नियतव्यय आणि खर्चा बाबत तपशीलवार माहिती संकलित करण्याची नवीन कार्यपध्दती विकसीत केली असल्याचे कळविले आहे. ही कार्यपध्दती १ एप्रिल २०१२ पासून सुरु होणे अपेक्षित आहे. नियोजन विभागाने, वित्त विभागाच्या सहकार्याने, त्रैमासिक तत्वावर ही आकडेवारी प्रसिद्ध करावी. याद्वारे निदेशांची अमलबजावणी अधिक पारदर्शक होण्यास मदत होईल. राष्ट्रपतींचे दिनांक ९ मार्च १९९४ रोजीचे आदेश आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ च्या खंड (२) चे उपखंड (ख) नुसार योजनेत्तर विकास खर्च देखील राज्यपाल यांच्या अखत्यारीत येत असल्यामुळे, राज्यपाल यांनी नियोजन विभागाला असे निदेश दिले आहेत की, वर नमूद केल्याप्रमाणे माहिती संकलित करतांना, त्यामध्ये सर्व क्षेत्रांसाठी विकास मंडळ क्षेत्रनिहाय योजनेत्तर खर्चाच्या तपशिलाचाही समावेश असावा.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

**(विकास चन्द्र रस्तोगी)**
**राज्यपालांचे सचिव**

**राजभवन, मुंबई.**
**दिनांक : १७ मार्च २०१२.**

## जोडपत्र – एक

निर्देशांक व अनुशेष समितीने गणना केल्यानुसार (दिनांक १ एप्रिल,१९९४ रोजी असल्याप्रमाणे) प्रदेशनिहाय वित्तीय अनुशेष दर्शविणारे विवरणपत्र. (रुपये कोटीत)

| अनुक्रमांक | प्रदेश | सिंचन | इतर अनुशेष क्षेत्र | एकूण अनुशेष |
|---|---|---|---|---|
| १ | विदर्भ | ४०८३.०० (५५.०४%) | २५४१.०२ (३८.५७%) | ६६२४.०२ (४७.६०%) |
| २ | मराठवाडा | २४०१.०० (३२.३७%) | १६०३.५५ (२४.३४%) | ४००४.५५ (२८.७७%) |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | ९३४.०० (१२.५९%) | २४४४.२० (३७.०९%) | ३३७८.२० (२३.६३%) |
| ४ | एकूण | ७४१८.०० (१००%) | ६५८८.७७ (१००%) | १४००६.७७ (१००%) |

आधार : निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल.

## जोडपत्र – दोन

अमरावती विभागातील गत चार वर्षातील अनुशेष

| | उर्वरित अनुशेष (हेक्टर रसतु मध्ये) | मागील वर्षात दूर झालेला अनुशेष (हजार हेक्टर रसतु मध्ये) |
|---|---|---|
| जून २००७ | ३,३८,०७० | |
| जून २००८ | २,९१,३७० | ४६,७०० |
| जून २००९ | २,६३,४५३ | २७,९१७ |
| जून २०१० | २,५७,५१८ | ५,९३५ |
| जून २०११ | २,४७,९४८ | ९,५७० |

## जोडपत्र – तीन

२००८-०९ मध्ये उर्वरित महाराष्ट्र आणि मराठवाडा प्रदेशासाठी विशेष तरतूद अंतर्गत देण्यात आलेल्या रुपये ४७५ कोटी नियतव्ययाची भरपाई करण्यासाठी प्रदेशनिहाय नियतव्यय दर्शविणारे विवरणपत्र

(रुपये कोटीत)

| प्रदेश | वित्तीय वर्ष २००८-०९ च्या निदेशांमध्ये निर्धारित केलेल्या सूत्रानुसार नियतव्ययाचे वाटप | विशेष तरतूद अंतर्गत दिलेली नियतव्यय | विशेष विभागणी अंतर्गत अधिक नियतव्ययाची भरपाई करण्यासाठी नियतव्ययाचे वाटप |
|---|---|---|---|
| विदर्भ | ५०.४६% | ० | २३९.६८५ |
| मराठवाडा | २०.४६% | १०० | -२.८१५ |
| उर्वरित महाराष्ट्र | २९.०८% | ३७५ | -२३६.८७ |
| | | ४७५ | ० |

## जोडपत्र चार अ

**वार्षिक योजना २०१२-१३ मधील सिंचन क्षेत्रातील नियत व्ययाच्या नियत वाटपाची तत्वे दर्शविणारे विवरणपत्र**

| प्रदेश | लोकसंख्या * (जनगणना २०११) | लोकसंखेची टक्केवारी | १९९४ मध्ये निव्वळ पेरलेले क्षेत्र (००० हेक्टर)# | निव्वळ पेरलेल्या क्षेत्राची टक्केवारी | लोकसंख्या आणि क्षेत्र यांचा भार (समान) |
|---|---|---|---|---|---|
| विदर्भ | २३००३१७९ | २३.०३% | ५१०६.८ | २८.२७% | २५.६५% |
| मराठवाडा | १८७२७७४८ | १८.७५% | ४७५५.९ | २६.३३% | २२.५४% |
| उर्वरित महाराष्ट्र | ५८१६३५९८ | ५८.२३% | ८१९९.३ | ४५.४०% | ५१.८१% |
| एकूण | ९९८९४५२५ | १००.००% | १८०६२ | १००.००% | १००.००% |

* आधार : जनगणना २०११

# आधार : निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल भाग एक

**जोडपत्र चार ब**

**आदिवासी उप योजनेमधील सिंचन क्षेत्रातील नियत व्ययाच्या नियत वाटपाची तत्वे दर्शविणारे विवरणपत्र- वार्षिक योजना, २०१२-१३**

| प्रदेश | लोकसंख्या (जनगणना २००१) | लोकसंखेची टक्केवारी | जनजाति उपयोजनेखालील क्षेत्र ) चौ.कि. मी.) | जनजाति उपयोजनेखालील क्षेत्राची टक्केवारी | लोकसंख्या आणि क्षेत्र यांचा भार (समान) |
|---|---|---|---|---|---|
| विदर्भ | २७५६११५ | ३२.४८% | ३११०१ | ५६.०७% | ४४.२७% |
| मराठवाडा | ६०८१०९ | ७.१७% | १९८३ | ३.५८% | ५.३७% |
| उर्वरित महाराष्ट्र | ५१२१९३२ | ६०.३६% | २२३८२ | ४०.३५% | ५०.३५% |
| एकूण | ८४८६१५६ | १००.००% | ५५४६६ | १००.००% | १००.००% |

आधार : आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन

## जोडपत्र पाच अ

**चालू वर्षाच्या उपलबध नियत  वाटपातून अनुशेष दूर करणे, नियतवाटपाच्या आधिक्य/तूट यांची दुरुस्ती यानुसार तीन प्रदेशांसाठी निधीचे नियत वाटप आणि त्यानंतर उर्वरित निधीचे लोकसंख्या व निव्वळ पेरणी क्षेत्र यांच्या भारांकाच्या आधारे करावयाचे संवितरण दर्शविणारे विवरणपत्र**

**(रुपये कोटीत)**

| | |
|---|---|
| सिंचन क्षेत्रासाठी विभाज्य नियतव्यय | ५५६२.९७ |
| अनुशेष दूर करण्यासाठी आवश्यक  नियतव्यय | ७५०.०० |
| नियत वाटप तत्वानुसार नियत वाटपासाठी उपलब्ध नियतव्यय | ४८१२.९७ |

(रु. कोटीत)

| प्रदेश | लोकसंख्या व निव्वळ पेरलेले क्षेत्र यांचे प्रदेशनिहाय प्रमाण(सम प्रमाणात) | शिल्लक निधींचे संवितरण | २००८–०९ ची विशेष विभागणी साठी दुरुस्ती | एकूण नियतवाटप |
|---|---|---|---|---|
| विदर्भ | २५.६५% | १२३४.५६ | २३९.६८५ | १४७४.२४ |
| मराठवाडा | २२.५४% | १०८४.८१ | –२.८१५ | १०८१.९९ |
| उर्वरित महाराष्ट्र | ५१.८१% | २४९३.६१ | –२३६.८७ | २२५६.७४ |
| एकूण | १००.००% | ४८१२.९७ | ० | ४८१२.९७ |

## जोडपत्र  पाच ब

**आदिवासी लोकसंख्या व आदिवासी उपयोजना क्षेत्र यांच्या भारांकाच्या आधारे आदिवासी उप योजना अंतर्गत निधीचे करावयाचे संवितरण दर्शविणारे विवरणपत्र**

**(रुपये कोटीत)**

सिंचन क्षेत्रासाठीचा विभाज्य नियतव्यय १०३.३९

| प्रदेश | लोकसंख्या आणि निव्वळ पेरणी क्षेत्र यांचे प्रदेशनिहाय भारांक (समान भार) | शिल्लक निधींचे संवितरण |
|---|---|---|
| विदर्भ | ४४.२७% | ४५.७८ |
| मराठवाडा | ५.३७% | ५.५५ |
| उर्वरित महाराष्ट्र | ५०.३५% | ५२.०६ |
| एकूण | १००.००% | १०३.३९ |

**जोडपत्र सहा**

**१ एप्रिल २०११ रोजी असल्याप्रमाणे चालू सिंचन प्रकल्पांची शिल्लक किंमत**

(रुपये कोटीत)

| **अनुक्रम** | **प्रदेश** | **प्रकल्पांची संख्या** | **१ एप्रिल २०११ रोजीची शिल्लक किंमत** |
|---|---|---|---|
| १ | विदर्भ | २७७ | २९४१३ |
| २ | मराठवाडा | १८३ | १३५८० |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | २८७ | ३२३७३ |
| | एकूण | ७४७ | ७५३६६ |

**जोडपत्र सात**

**१ एप्रिल २०१२ रोजी असल्याप्रमाणे विकास क्षेत्रातील प्रदेशनिहाय उर्वरित वित्तीय अनुशेष दर्शविणारे विवरणपत्र**

(रुपये कोटीत)

| **अ.क्र** | **विकास क्षेत्र** | **विदर्भ** | | **मराठवाडा** | | **उर्वरित महाराष्ट्र** | | **एकूण** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **१.४.२००० रोजी असलेला अनुशेष** | **१.४.२०१२ रोजी असलेला उर्वरित अनुशेष** | **१.४.२००० रोजी असलेला अनुशेष** | **१.४.२०१२ रोजी असलेला उर्वरित अनुशेष** | **१.४.२००० रोजी असलेला अनुशेष** | **१.४.२०१२ रोजी असलेला उर्वरित अनुशेष** | **१.४.२००० रोजी असलेला अनुशेष** | **१.४.२०१२ रोजी असलेला उर्वरित अनुशेष** |
| १ | सार्वजनिक आरोग्य | १८७.३४ | ४५.६० | ४२२.७४ | २६०.९३ | ७४३.५९ | ३३१.४८ | १३५३.६७ | ६३८.०१ |
| | **एकूण** | **१८७.३४** | **४५.६०** | **४२२.७४** | **२६०.९३** | **७४३.५९** | **३३१.४८** | **१३५३.६७** | **६३८.०१** |
| | | | **७.१५%** | | **४०.९०%** | | **५१.९५%** | | **१००%** |

## जोडपत्र आठ

**वार्षिक योजना २०१२-१३ मध्ये सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रतील अनुशेष दूर करण्यासाठी नियतव्ययाचे क्षेत्र-निहाय नियत वाटप दर्शविणारे विवरणपत्र**

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | क्षेत्र | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | **तंत्र शिक्षण** | २३.९८ | ८.२४ | २३.१९ | ५५.४१ |
| अ | **औद्योगिक प्रशिक्षण संस्था** | ०० | ०० | ११.९७ | ११.९७ |
| ब | **तंत्रनिकेतने** | १५.४१ | १.२० | ६.६९ | २३.३० |
| क | **तंत्र माध्यमिक शाळा** | ८.५७ | ७.०४ | ४.५३ | २०.१४ |
| २ | **सार्वजनिक आरोग्य** | १२२.७१ | ३९.३० | ६६.९६ | २२८.९७ |
| ३ | **पंपसंचाचे विद्युतीकरण** | १२८.८६ | ०० | २१.२२ | १५०.०८ |
| | **एकूण** | **२७५.५५** | **४७.५४** | **१११.३७** | **४३४.४६** |
| | | **६३.४२%** | **१०.९४%** | **२५.६४%** | **१००%** |

तळटीप :- परिच्छेद ३९ मध्ये स्पष्ट केलेल्या प्रयोजनाकरिता वरील नियतवाटपाखेरीज, रुपये २ कोटी इतकी रक्कम राखून ठेवण्यात येईल.